**डॉ. गिरीश मोरे**
अधिव्याख्याता, मराठी विभाग,
राजर्षी शाहू कला व वाणिज्य
महाविद्यालय, रुकडी,
ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर.

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, **संतोष मारूती काळे** यांनी **'शेषराव मोहिते यांच्या कादंबरी लेखनाचा अभ्यास'** ('असं जगणं तोलाचं' व 'धूळपेरणी'च्या आधारे) या विषयावरील लघुप्रबंधाचे संशोधन कार्य माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले आहे. हा लघुप्रबंध स्वतंत्ररीत्या लिहिलेला असून यापूर्वी कोणत्याही विद्यापीठात अन्य परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

सदर लघुप्रबंध 'मराठी ग्रामीण कादंबरी' या अभ्यासक्षेत्रात समाविष्ट होतो.

सदर लघुप्रबंध शिवाजी विद्यापीठाच्या एम.फिल. (मराठी) पदवी परीक्षेसाठी सादर करण्यास माझी अनुमती आहे.

ठिकाण : कोल्हापूर

मार्गदर्शक

दिनांक : १६ फेब्रुवारी, २००९

**डॉ. गिरीश मोरे**

कर्जाला कंटाळून

आत्महत्या करणाऱ्या

शेतकऱ्यांना...

आणि

कै. आजोबा (आप्पा) व आज्जी (बाई)

यांच्या स्मृतीस....

# ऋणनिर्देश

शिवाजी विद्यापीठाच्या एम. फिल. (मराठी) पदवी परीक्षेसाठी 'शेषराव मोहिते यांच्या कादंबरी लेखनाचा अभ्यास' ('असं जगणं तोलाचं' व 'धूळपेरणी'च्या आधारे) या विषयावरील लघुप्रबंध सादर करताना मला अत्यानंद होत आहे. या संशोधनासाठी ज्यांचे सहकार्य व प्रेरणा लाभल्या त्यांच्या विषयी कृतज्ञता व्यक्त करणे हे मी माझे कर्तव्य समजतो.

ग्रामीण साहित्य हा माझा पूर्वीपासूनच आवडीचा विषय राहिला आहे. वाचन करताना शेषराव मोहिते यांच्या कादंबऱ्याही माझ्या वाचनात आल्या. या कादंबऱ्यांतील ग्रामीण जीवन आणि वास्तवता माझ्या मनाला भिडली. आपणही असेच जीवन जगलो आहोत याची जाणीव माझ्या मनाला झाली. शिवाजी विद्यापीठामध्ये संशोधनासाठी आल्यानंतर विषय निवडण्याची वेळ आली तेव्हा 'शेषराव मोहिते यांच्या कादंबरी लेखनाचा अभ्यास' हा विषय निवडण्याचे निश्चित केले.

एम्. फिल. च्या संशोधन कार्यासाठी डॉ. गिरीश मोरे सरांनी केलेले मार्गदर्शन अनमोल आहे. त्यांनी केलेले मार्गदर्शन हे संशोधन कार्यापुरतेच मर्यादीत नसून भावी जीवनासाठी बहुमोल असेच आहे. माझ्यासारख्या ग्रामीण विद्यार्थ्यामध्ये संशोधक वृत्ती जागृत करून अभ्यासाची एक दिशा व दृष्टी त्यांनी दिली. सरांच्या स्नेहपूर्ण मार्गदर्शनामुळेच मी हा लघुप्रबंध पूर्ण करू शकलो. आदरणीय डॉ. गिरीश मोरे आणि त्यांचे कुटुंबीय यांचे ऋण शब्दात व्यक्त न करता मी त्यांच्या कायम ऋणातच राहणे पसंत करतो.

मी ज्या हायस्कुलमध्ये दहावीपर्यंतचे शिक्षण घेतले त्या जय जगदंबा विद्यालय, ढवळस येथील मराठी विषयाच्या शिक्षिका सौ. शोभा तळेकर मॅडम

यांनी माझ्यामध्ये मराठी विषयाची आवड निर्माण केल्यामुळेच मी आज मराठी विषयातून एम्. फिल. साठी संशोधन करू शकलो. त्यामुळे त्यांचेही ऋण व्यक्त करणे मी माझे कर्तव्य समजतो.

पदवीपर्यंतचे शिक्षण घेतलेल्या के. एन. भिसे, आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज, कुर्डूवाडी या महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख गुरूवर्य प्रा राम इवरे, प्रा. प्रकाश कांबळे यांनी आत्मीयतेने केलेले मार्गदर्शन बहुमोल आहे. एम. ए. पर्यंतचे शिक्षण घेतलेल्या शिवाजी महाविद्यालय, बार्शी येथील मराठी विभाग प्रमुख प्रा. सौ. भारती रेवडकर, प्रा. राजेंद्र दास व डॉ. बिरा पारसे यांचेही मार्गदर्शन लाभले. शिवाजी विद्यापीठातील मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. विश्वनाथ शिंदे, प्रा. डॉ. रवींद्र ठाकूर, प्रा. डॉ. कृष्णा किरवले, डॉ. रणधीर शिंदे, प्रा. हिमांशू स्मार्त यांनी वेळोवेळी केलेले मार्गदर्शन बहुमोल आहे. तसेच लिपीक शिगांवकर मॅडम व सेवक मिनाक्षी स्वामी यांनी कार्यालयीन कामामध्ये केलेल्या सहकार्याबद्दल त्यांचेही आभार!

मला कोणताही शैक्षणिक वारसा नसताना, माझ्यासाठी जीवाचं रान आणि रक्ताचं पाणी करणाऱ्या आई व आबा यांच्या कष्टामुळेच मी हा लघुप्रबंध पूर्ण करू शकलो. हा लघुप्रबंध पूर्ण करण्यासाठी आशीर्वाद देताना माझ्या पाठीवरून फिरणारे त्यांचे हात आजही शेतात राबताना दिसतात, तेव्हा मन भरून येते आणि हा लघुप्रबंध पूर्ण करण्याचे बळ मिळते. प्रतिकुल परिस्थितीतही आलेल्या संकटाला धैर्याने आणि चिकाटीने सामोरे जाण्याचे त्यांनी दिलेले बळ आणि कृपाशीर्वाद हेच माझ्या जीवनाचे खरे आधारस्तंभ आहेत. तसेच माझे चुलते श्री. ज्ञानदेव (दादा), रामकृष्ण (बापू), हरिश्चंद्र (तात्या) यांचेही आशीर्वाद आणि प्रेरणा सतत पाठीशी आहेत. त्यामुळे यांचे ऋण व्यक्त न करता त्यांच्या ऋणातच राहणे पसंत करतो.

स्वत: शिक्षण घेत असूनही माझ्या शिक्षणासाठी शेतात राबणारा लहान भाऊ सुदर्शन तसेच सातत्याने विचारपूस करून प्रोत्साहन देणारी बहीण उज्ज्वला. याशिवाय अशिक्षित असूनही माझ्या संशोधनाची चौकशी करणारे भगवान (भाऊ), शिक्षणामध्ये अतिशय हुशार असणारा व माझ्या कोणत्याही निर्णयाशी सहमती दर्शविणारा सुशेन, गोविंद, पुष्पा, कालिंदा व शिवकन्या या बंधू-भगिनींनी सातत्याने आत्मीयतेने केलेली विचारपूस माझ्यासाठी प्रेरणादायी ठरली. नोकरीला असूनही दुरध्वनीद्वारे सातत्याने माझे मनोबल वाढवणारे बंधू नागनाथ (तात्या) व गणेश. माझे मामा नागनाथ लोंढे व मावशी सौ. सुलन भोरे, सौ. रतन काकडे यांनीही दिलेले प्रोत्साहन फलदायी ठरले.

शिवाजी विद्यापीठातील 'मागेल त्याला काम' या योजनेअंतर्गत 'सलग्नता-टी-२' या विभागामध्ये काम करत असताना श्री. राहूल गुरव व श्री. प्रकाश तोरसे सर यांचेही मिळालेले सहकार्य कौतुकास्पद आहे. त्यांचेही आभार!

माझ्या संशोधनाची स्वत: दूरध्वनीवरून जाणीवपूर्वक चौकशी करून प्रेरणा देणारे विठ्ठल शुगर्स मॅन्यू. लि. म्हैसगाव, ता. माढा या साखर कारखान्याचे चिफ इंजि. श्री. देवराव रा. लोकरे साहेब यांचे मन:पूर्वक आभार!

बी. ए. पदवीपासून बरोबर असणारे आणि या संशोधनासाठी शिवाजी विद्यापीठाचा मार्ग दाखवणारे गुरुबंधू संतोष बोंगाळे तसेच माझ्या संशोधनाची सातत्याने चौकशी करून स्फूर्ती देणारे अमोल जाधव या परम मित्राचेही आभार मानतो. त्याचबरोबर सचिन रूपनर, सचिन आवताडे, सचिन धायगुडे, समीर कोळी, शरद माने-पाटील, विजय बेदरे, सुहास कद्रे, पद्माकर वानखडे, योगेश चव्हाण, अमित शेटे, बजरंग माळी, गजानन अपीने, इंद्रजीत वीर, दत्ता घोलप, प्रकाश नाईक, नामदेव गपाटे, श्रीकृष्ण पडळकर, विजय शिंदे, रामेश्वर कांबळे,

सयाजीराव गायकवाड, अनिल मकर, सिद्धेश्वर खरात इ. संशोधक मित्र आणि प्रा. उज्ज्वला सामंत, वैशाली बामणे व स्वाती मोरे या मैत्रिणींचेही सहकार्य या कामी उपयुक्त ठरले. याशिवाय सचिन चव्हाण, श्रीकृष्ण जगदाळे, संतोष नवले, रवींद्र उन्हाळे, विकास मोरे, अजिनाथ पवार, विजय जाधव, आप्पाराव निंभोरकर, ज्ञानेश्वर पवार, विष्णू पवार, सचिन पवार, परमेश्वर खडतरे, सुनील मोटे या सर्व जिवलग मित्र परिवाराने दिलेले प्रेम आणि स्नेह अविस्मरणीय आहे.

संदर्भ ग्रंथ उपलब्ध होण्याचे ठिकाण म्हणजे ग्रंथालय, शिवाजी विद्यापीठातील डॉ. बाळासाहेब खयर्डेकर ग्रंथालयातील ग्रंथपाल व अन्य कर्मचारी यांनी हसतमुखाने केलेल्या सहाकार्याबद्दल त्यांचेही आभार!

'सायली कॉम्प्युटर' चे श्री. अमर धनवडे सर व त्यांची धर्मपत्नी सौ. राजश्री धनवडे यांनी संगणक टंकलेखनासाठी घेतलेले अथक् परिश्रम पाहता मी त्यांचे ऋण मानतो. या कामी त्यांनी जो उत्साह दाखवून लघुप्रबंधाचे काम वेळेत पूर्ण करून दिले त्याबद्दल मी मन:पूर्वक कृतज्ञ आहे.

हा लघुप्रबंध पूर्ण करत असताना अशा अनेक ज्ञात अज्ञात व्यक्तिंचे मला प्रेरणा व सहकार्य लाभले. त्या सर्वांचे पुन्हा एकदा मन:पूर्वक आभार!

**– संतोष काळे**